# खराडे अ‍ॅग्रो

फ्रुटनेट आणि अँटी फोग बॅगचे विश्वसनीय उत्पादक!

अंक: दहावा || संपादन: श्रीमंत-पब्लिकेशन, पुणे || दि. ०१ नोव्हेंबर २०२४

## सर्व शेतकरी बांधवांना दीपावलीच्या खूप खूप शुभेच्छा...



## कृषी जगतातील विशेष घडामोडी

- राज्यात मोबाईल अॅपद्वारे होणाऱ्या पशुगणनेस सुरुवात.
- कांद्याच्या दरावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारचा प्लॅन; महाराष्ट्रातून 'कांदा एक्सप्रेस' दिल्लीला रवाना.
- केंद्र सरकारने रब्बी हंगामातील पिकांसाठी किमान आधारभूत किंमती (एमएसपी) मध्ये केली वाढ.
- लक्ष्मीपूजन, पाडव्यामुळे झेंडू, शेवंतीला मागणी वाढणार.
- हंगामाच्या प्रारंभीच डाळिंबाचे दर दबावात.

**३१ ऑक्टोबर, २०२४:** रोषणाई आणि नाविण्याची ही दिवाळी आपल्या वैयक्तिक तसेच सामाजिक व व्यवसायिक जीवनात चैतन्य घेऊन येवो. सुलतानी संकटांचा कायम सामानाकरत कष्टाच्या वाटेवर निर्धाराने चालणाऱ्या सर्व शेतकरी बांधवांना खराडे अॅग्रोच्या वतीने खूप खूप शुभेच्छा!

शेती म्हटले की विविध नैसर्गिक तसेच अनैसर्गिक अडचणींचा सामना करणे हे अनिवार्य असते. या अडचींमधून बरेचजण सुखरुप बाहेर तर पडतात, पण अनेकांवरती मात्र जगण्या मरण्याचा प्रसंग ओडवतो. खराडे अॅग्रोच्या वतीने आम्ही आवाहन करतो की या दिवाळी पासून शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञान(योग्य प्रमाणात व अभ्यासपूर्ण पद्धतीने) तसेच जास्तीत जास्त वैद्यनिक दृष्टिकोन ठेवून वाटचाल करावी. आर्थिक अडचणींना बळी पडून कोणतेही अविवेकी पाऊल न टाकावे! आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतीविषयक कोणत्याही मार्गदर्शनासाठी खराडे अ‍ॅग्रोशी नक्की संपर्क साधावा.



|| पुढील पानावर ||

- दिन दिन दिवाळी; गायी म्हशी ओवाळी!
- यशोगाथा
- बोल अनुभवाचे

Plot No G 251, M.I.D.C. Baramati | 9309253091 || 9209317742

# दिन दिन दिवाळी; गायी म्हशी ओवाळी!






३१ ऑक्टोबर, २०२४: भारतात अनेक पद्धतीने दिवाळीची सुरुवात होते. मात्र, महाराष्ट्रात वसूबारस पासून दिवाळीची खरी सुरुवात होत असते. ग्रामीण भागात शेतकरी गाय आणि वासरांचे पूजन करून वसूबारस साजरी करतात. गाय ही कृष्ण स्वरूपात प्रभूंचे प्रतिनिधित्व करते, अशी श्रद्धा असल्याने वसूबारसला आपल्याकडे विशेष महत्व आहे. 'दिन दिन दिवाळी गायी म्हशी ओवाळी' असे म्हणत दिवाळीचा उत्सव सुरू होतो. 'वसूबारस' ला गोधनाची पूजा करून कृतज्ञता व्यक्त केली जाते.

हिंदू धर्मात गाईला महत्वाचे स्थान आहे. 'वसूबारस' हा गाई व गोधनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. आश्विन कृष्ण द्वादशीस म्हणजेच गोवत्सद्वादशीस 'वसूबारस' साजरी केली जाते. यावेळी गायीची वासरासह पूजा करण्यात येते. घरांत लक्ष्मीचे आगमन व्हावे, या हेतूनेही या दिवशी सवत्स धेनूची पूजा करण्याची पद्धत आहे.

**पर्यावरण संवर्धन:** गायी गुरे सांभाळणे पर्यावरण संवर्धनासाठी महत्त्वाचे आहे. गायींच्या शेणाचा वापर शेतात खत म्हणून केला जातो.

**आर्थिक स्थैर्य:** गायी दुधाचे उत्पादन करतात. दुधापासून विविध दुग्धजन्य पदार्थ बनवले जातात. त्यामुळे गायींची जोपासना करणे आर्थिक दृष्ट्या फायदेशीर ठरते.

**धार्मिक महत्त्व:** गायीला पवित्र मानले जाते. त्यामुळे गायींची सेवा करणे पुण्य मानले जाते.

**गायीत श्रीकृष्णाचे वास्तव आहे:** वसु म्हणजे द्रव्य (धन) त्यासाठी असलेली आणि बारस म्हणजे द्वादशी म्हणून या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. वसूबारस साजरी करण्यामागे अजून माहिती अशी सांगितली जाते की, दिवाळीच्या दरम्यान वातावरणामध्ये अधिक प्रमाणात ऊर्जा निर्माण होत असते. गाय देखील कृष्ण स्वरूपात प्रभूचे प्रतिनिधित्व करते आणि म्हणून या दिवशी गायीची सामोहिक उपासना देखील केली जाते.

---



# सूर्यफुल शेती करा, कमी वेळात भरघोस नफा मिळवा!



**३१ ऑक्टोबर, २०२४:** रब्बी हंगामात कोरडवाहू क्षेत्रात करडईनंतर सूर्यफुल हे पिक तेलबिया पिक घेतले जाते. खरीप पिकाचा विचार केला तर रब्बी हंगामात जमिनीत साठवलेल्या ओलाव्यावर हे पिक घेतले जाते, त्यामुळे पिक वाढीच्या काळात पावसाचा खंड पडला म्हणून पिकाचे नुकसान झाले असे होत नाही.म्हणून खरीपापेक्षा रब्बी हंगामात हमखास उत्पादन मिळण्याची शाश्वती असते. तसेच उत्पादनही चांगले मिळते.

शेतकरी सातत्यानं शेतीत नवनवीन प्रयोग करत आहेत. विविध संकटांचा सामना करत भरघोस उत्पादन घेत आहेत. कमी खर्चात चांगला फायदा देणाऱ्या पिकांची लागवड करत आहेत. सूर्यफूल शेती देखील अशीच आहे. सूर्यफुलाच्या लागवडीतून कमी वेळात शेतकऱ्यांना चांगला नफा मिळतो. ही सूर्यफुलाची शेती नेमकी कशी करावी? सूर्यफुलाची लागवड करताना शेतकऱ्यांनी नेमकी काय काळजी घ्यावी? याची सविस्तर माहिती पाहुयात.

देशातील कर्नाटक, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, ओरिसा, तामिळनाडू आणि बिहारमध्ये सूर्यफुलाची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जात आहे. सूर्यफुलाची शेती करताना शेतकऱ्यांनी फक्त सुधारित वाणांचीच निवड करावी, जेणेकरून अधिक बियाणे आणि तेलाचे उत्पादन घेता येईल. आंतरराष्ट्रीय स्तरावर सूर्यफुलाच्या वाणांचे संमिश्र आणि संकरीत वर्गीकरण करण्यात आले आहे. सूर्यफूलाचे पिकं हे 100 ते 120 दिवसांत तयार होते.

**सूर्यफुलाची लागवड करताना 'या' गोष्टी लक्षात ठेवा:** लागवडीपूर्वी जमिनीची चांगली मशागत करा. सूर्यफुलाच्या सुधारित आणि संकरित वाणांची पेरणी करावी. शेतात चांगल्या उत्पादनासाठी कुजलेले शेण किंवा गांडूळ खत टाकावे. शेतकरी नत्र, फॉस्फरस, पोटॅशियम, गंधक आणि सूक्ष्म घटकांचा वापर माती परीक्षण करुन करू शकता. सूर्यफूल पिकावर फुलोऱ्याच्या वेळी बोरॅक्सची फवारणी केली जाते. जेणेकरून बियाण्याची गुणवत्ता अबाधित राहते.

**सूर्यफूल शेतीचे फायदे काय?**

तेलासाठी सूर्यफुलाची शेती केली जाते. पण अनेक कंपन्या त्यातून सौंदर्य उत्पादनेही तयार करतात. सूर्यफुलाचे तेल हे खाद्यतेल म्हणूनही वापरले जाते. सूर्यफुलांच्या सुधारित बियाणांची लागवड शेतकऱ्यांना फायदा होऊ शकतो. दरवर्षी सूर्यफुलाला मोठी मागणी असते. अशा परिस्थितीत शेतकरी बांधव सूर्यफुलाची लागवड करून चांगला नफा कमवू शकतात.

| **पीक : सूर्यफूल** | |
|---|---|
| भारतातील एकूण क्षेत्र | १.४८ लाख हे. |
| भारतातील एकूण उत्पादन | १.६९ लाख टन |
| महाराष्ट्रातील एकूण क्षेत्र | ०.०६ लाख हे. |
| महाराष्ट्रातील एकूण उत्पादन | ०.०२ लाख टन |

**स्त्रोत** : युनिफाइड पोर्टल फॉर ॲग्रिकल्चरल स्टॅटिस्टीक्स, कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग, कृषी मंत्रालय, नवी दिल्ली

# "बहुविध पीक पद्धतीतून उत्पन्नाची शाश्वती" ज्ञानेश्वर पिसाळ



ज्ञानेश्वर पिसाळ

**सातारा:** सातारा जिल्ह्यात वाई तालुक्यात सर्वाधिक हळद पीक घेतले जाते. तालुक्यात पाचवड व वाई रस्त्यावर व्याजवाडी (ता. वाई) हे छोटे गाव आहे. येथील ज्ञानेश्वर पिसाळ हे प्रगतिशील शेतकरी असून, त्यांची १२ एकर बागायती शेती आहे. बारावीचे शिक्षण झाल्यानंतर वडील महादेव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शेतीला सुरुवात केली. पाण्याची उपलब्धता असल्याने ऊस, हळद, आले यांसारख्या दीर्घ कालावधीच्या नगदी पिकांना प्राधान्य दिले.

कृषी विभागाच्या सहलीतून भाजीपाला पीक पद्धतीची संकल्पना पुढे आली. टोमॅटो, वांग्याचे उत्पादन यशस्वी झाले. हंगामाचा विचार करून लागवडीचे नियोजन केल्यास उत्पन्न चांगले मिळते हे लक्षात आले. भाजीपाल्याचे 'प्लॉट' उत्कृष्ट केल्याने खासगी कंपन्यांनी 'डेमो प्लॉट' घेण्यास सुरुवात केली. त्यातून उत्साह येत भाजीपाला पिकांखालील क्षेत्र वाढवत नेले. प्रयोगशीलतेतून टप्प्याटप्प्याने शेतीत बदल सुरू केले.

बारा एकरांपैकी सुमारे दीड एकरांत हळद, एक एकर आले व चार एकरांपर्यंत ऊस अशी दीर्घ कालावधीची पिके. तर उर्वरित क्षेत्रात टोमॅटो, कोबी, मिरची या प्रमुख पिकांसह वांगी, काकडी, दोडका, शेवगा, कारली, टरबूज कलिंगड ही पिके थोड्या थोड्या क्षेत्रात घेतली जातात. काही उसात तर काही आले पिकात आंतरपिके.

एकरी १० ट्रेलर शेणखताचा वापर. लागवडीसाठी चार फुटी बेड, दोन ओळींत एक फूट अशी पद्धत. सततची भांगलण टाळण्यासाठी भरीची संख्या वाढविली जाते. शेणखत, लेंडी खत व जिवामृताचा जास्त वापर. त्यातून रासायनिक खतांचा वापर केला कमी. सहा महिने कालावधीसाठी प्रगती तर नऊ महिने कालावधीसाठी सेलम वाणाचा वापर. सहा महिन्यांत एकरी १२ ते १३ टन तर नऊ महिन्यांत एकरी वाळवून ३० ते ३५ क्विंटलपर्यंत उत्पादन. ऑनलाइन विक्री उद्योगातील आघाडीच्या कंपनीद्वारे ओल्या हळदीची होते विक्री. त्यास किलोला ८० ते १०० रुपयांपर्यंत मिळतो दर.

पिसाळ यांनी शेतीतील उत्पन्नातूनच चार एकर शेती खरेदी केली. तीन ट्रॅक्टर, अवजारे, पाण्यासाठी टँकर, पॅकहाउस या सुविधा केल्या, पुण्यात फ्लॅट घेतला, नीरज व आदित्य ही मुले अभियांत्रिकीचे शिक्षण घेत आहेत. ज्ञानेश्वर यांच्या आईचे निधन झाले आहे. वडिलांचा त्यांना मोठा आधार असून वय वर्षे ८५ मध्येही ते शेतीत सक्रिय असतात. पत्नी आश्विनी घर सांभाळून शेतात पतीच्या बरोबरीने राबतात. कृषी अधिकारी, प्रगतिशील शेतकऱ्यांनी पिसाळ यांच्या शेतीला भेटून कौतुक केले आहे. कृषी विभाग, आत्मा विभागाच्या योजनांचा मोठा फायदा झाला आहे.

## || बोल अनुभवाचे ||

### श्री. नितीन आगावणे (बारामती)

माझ्या तीन एकरातील पेरू बागेतील फळांचे संरक्षण खराडे अॅग्रोच्या फ्रुटनेट ने केले जाते. विविध ठिकाणी चौकशी केल्यानंतर आम्ही आमचा ब्रँड ठाम केला आणि तो म्हणजे खराडे अॅग्रो!

यांच्या फ्रुटनेट बद्दल सांगताना बऱ्याच गोष्टी आहेत जसकी फ्रुटनेट आणि फोम ची क्वालिटी, सेवा तत्परता, वैगैरे...वैगैरे...पण मी खराडे अॅग्रोच्या फ्रुटनेट बद्दल टिपलेला एक महत्वपूर्ण अनुभव म्हणजे त्यांचे फ्रूटनेट हे नुकतेच कंपनीतून बनवूनआलेले असते. ज्या मुळे ते अतिशय लवचिक, बसवायला सोपे व दीर्घायु असते.

### सद्गुरू फोम डीलर (बारामती)

अलीकडच्या काळात फ्रुटनेटच्या क्वालिटी मुळे शेतकऱ्याचा व बागायत दारांची एकमेव निवड म्हणजे खराडे अॅग्रो आहे हे सांगताना आनंद होतो. बारामती व इतर अनेक जिल्हात आपली उपलब्धता व सेवा तत्परता सिद्द करत असताना कंपनीने आजपर्यंत अनेक शेतकऱ्यांना विविध शेती संबंधी विषयांवर मोफत मार्गदर्शन तसेच आत्मबळ दिले आहे.